प्रती

I.O. करीता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** राहुरी **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1023 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/10/2022 13:06 वजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 13/10/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 13/10/2022
**Time From (वेळेपासून):** 16:15 वजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 वजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/10/2022 **Time (वेळ):** 12:56 वजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 020 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/10/2022 12:56 वजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, .1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** राहुरी पोलीस स्टेशन परिसर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मुजफ्फर कादर शेख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी स., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मुलनमाथा ता.राहुरी, जि.अहमदनगर,राहुरी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मुलनमाथा ता.राहुरी, जि.अहमदनगर,राहुरी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोना1567 शहामद शब्बीर शेख | | | 1. राहुरी पोलीस स्टेशन ,राहुरी, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू.-मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद अहमदनगर

दि.28/10/2022मी मुजफ्फर कादर शेख, वय 32 वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा.मुलनमाथा ता.राहुरी, जि.अहमदनगर मो.नं.9075121939.समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर माझे कुटूंबियासह राहणेस आहे. मी दि 13/10/2022 रोजी ला.प्र.वि.अहमदनगर येथील पोलीस निरीक्षक श्री गमे यांना फोनव्दारे संपर्क करून लाच मागणीची तक्रार सांगितली होती. पोलीस निरीक्षक गमे यानी मला राहुरी येथे सुरक्षित ठिकाणी दुचाकी वाहनासह व लाचेच्या रकमेसह हजर राहण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे मी राहुरी येथील सुरक्षित ठिकाणी हजर असताना 15/30 वा.सुमारास पोलीस निरीक्षक गमे हे शासकीय चारचाकी वाहनाने तेथे आले. त्यानी मला माझी ओळख विचारून मला सदर शासकीय वाहनात बसण्यास सांगितले. त्यानतर पोलीस निरीक्षक गमे यानी सदर वाहनात हजर असलेले दोन पंच, सापळा पथकातील कर्मचारी यांचेशी माझी ओळख करून दिली. उपस्थित दोन्ही पंचानी मला माझे नाव, पत्ता व तक्रार विचारली असता मी त्यांना माझे नाव, पत्ता वरील प्रमाणे सांगुन तक्रार सांगितली की, दिनांक 12/07/2022 रोजी माझेविरूध्द निलोफर अकबर शेख, रा.मुलनमाथा, ता.राहुरी हिने राहुरी पोलीस स्टेशनला तक्रारी दिल्याने माझेविरुध्द अदखलपात्र गुन्हा नंबर 1401/2022 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर अदखलपात्र गुन्हयामध्ये तहसिल कार्यालय, राहुरी येथे दिनांक 10/08/2022 रोजी माझेवर चप्टर केस करण्यात आली होती. त्यावेळी राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक शामद शेख यानी चप्टर केस झाल्यानतर मला सोडुन दिले नव्हते. त्यावेळी मला पोलीस नाईक शेख यानी 5000/- रुपयाची मागणी केली होती. परंतु त्यावेळी मी त्यांना पैसे दिले नव्हते. त्यानतर पोना.शेख यानी दोन दिवसानी मला राहुरी पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेतले व मला तु वरील नमुद तक्रारदार यांचे घरामध्ये कसा काय घुसला असे म्हणुन माझे अगावरील कपडे काढुन मला मारहाण केली व त्यावेळी शेख पोलीस यानी साहेबांना 3000/- रुपये दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे 5000/- रुपयाची मागणी केली व तुझ्याविरुध्द दाखल असलेला अदखलपात्र गुन्हा मिटवुन टाकु त्यासाठी तु मला 5000/- रुपये दे असे म्हणाले. त्यावेळी माझे असे लक्षात आले की शेख पोलीस हे माझेकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. मी त्यावेळी त्याना पैसे दिले नाही व तेथुन निघुन गेलो. त्यानतर शेख पोलीस यानी मला दोन वेळा फोन करुन राहुरी पोलीस स्टेशनला बोलाविले परंतु शेख पोलीस हे माझेकडे पैशाची मागणी करीत असल्याबाबत माझ्या लक्षात आले. त्यानतर मी ला.प्र.वि. अहमदनगर येथे संपर्क करुन माझी लाच मागणी संबधाने तक्रार कळविली. मी आज रोजी राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक शेख यांची भेट घेणार आहे, त्यावेळी शेख पोलीस यानी माझेकडे त्यानी मागणी केलले 5,000/- रुपये लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी. शेख पोलीस व माझेत कोणत्याही प्रकारचा आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही. तसेच आमचेत कोणताही वैरभाव नाही. तरी मला शेख पोलीस याना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यानी माझेकडे लाचेची मागणी केल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी तोंडी तक्रार सांगितली. त्यानतर पोनि गमे यानी माझी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून देण्यास सांगितले असता मी मला लिहिता येत नाही, परंतु वाचता येते असे सांगितल. त्यानतर पोनि

गमे यांचे सुचनेवरुन मी सांगितली त्याप्रमाणे सापळा पथकातील पोना चौधरी यांनी माझी तक्रार लिहुन घेतली. सदरची तक्रार मी वाचुन पाहुन त्यावर मी, पोनि गमे व पंचानी सहया केल्या. त्यानंतर माझे तक्रारी प्रमाणे लोकसेवक शेख, पोलीस हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची ? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर पोनि गमे यांनी मला व पंच 1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. तसेच व्हाईस रेकर्डरचे वापराबाबत माहिती दिली. त्यानंतर पोनि गमे यांचे सुचनेवरुन पोना चौधरी यांनी व्हईस रेकर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकर्डर सुरु करुन तो माझे ताब्यात दिला. मला व पंच नं. 1 यांना शेख, पोलीस यांची राहुरी पोलीस स्टेषन येथे भेट घेण्यासाठी 16/15 वा. सुमारास माझेकडील मो.स. हिरो स्प्लेंडर क्र. एमएच-17-अ◌के-1789 ने रवाना केले. मी व पंच नं. 1 असे राहुरी पोलीस स्टेषन येथे जात असताना, पोलीस स्टेशनच्या बाहेर असलेल्या चहाचे टपरीजवळ शेख पोलीस उभे होते. शेख पोलीस यांनी मला आवाज देवुन त्यांचेजवळ बोलावून घेतले. तेथे शेख, पोलीस व माझेत राहुरी पोलीस स्टेशन येथे माझेविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाचे संबंधाने चर्चा झाली. त्यावेळी शेख पोलीस यांनी माझेविरुध्द राहुरी पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयात चप्टर केसमध्ये मला मदत केल्याचे मोबदल्यात तडजोडी अंती 4,000/-रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तेथुन निघुन पोनि गमे व सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि गमे यांचे सुचनेवरुन पोना चौधरी यांनी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर त्यांचे ताब्यात घेवुन तो बंद केला. पोनि गमे यांनी मला व पंच नं.1 यांना शेख, पोलीस यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यन्तच्या हकीकतीबाबत विचारता आम्ही त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि गमे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाशण ऐकुन त्याबाबत खात्री केली. शेख, पोलीस यांनी माझ्याकडे स्पश्टपणे लाचेची मागणी केली असल्याने त्यांचे विरूध्द लाचेची सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.पोनि गमे यांनी मला शेख, पोलीस यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, मी माझे बचतीमधील 4,000/- रु., त्यात 500/-रु दराच्या 08 चलनी नोटा हजर केल्या. त्यानंतर अन्थ्रासिन पावडर व अ.व्ह. दिव्याचा वापर, गुणधर्म याबाबत मला व पंचांना माहीती देण्यात आली. मी हजर केलेल्या नोटांना पोना चौधरी यांनी अन्थ्रासिन पावडर लावली व नोटांची घडी माझे पन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिषामध्ये ठेवुन दिली. त्यानंतर पोनि गमे यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोनि गमे यांचे सुचनेवरुन पोना चौधरी यांनी व्हाईस रेकर्डर मध्ये नविन मेमरीकार्ड टाकुन व्हईस रेकर्डर चालु करुन माझे ताब्यात दिला. त्यानंतर मला पंच नं.1 यांचेसह लोकसेवक शेख, पोलीस यांची भेट घेण्यासाठी माझे मो. सायकलवरून रवाना केले. मी व पंच नं. 1 असे राहुरी पोलीस स्टेषन येथे आलो. तेथे बाहेर मी माझी मो.सायकल उभी केली. आमच्या पाठोपाठ पोनि गमे व सापळा पथक असे षासकिय वाहनाने येवुन षासकिय वाहन पोलीस स्टेषनपासुन थोडया अंतरावर उभे करून पायी चालत आले व राहुरी पोलीस स्टेषनच्या आजुबाजुस कोणास संषय येणार नाही अषा रितीने सापळा लावुन थांबले. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यावर मी व पंच नं. 1 असे राहुरी पोलीस स्टेषनच्या आत गेलो. तेथे गेलेनंतर मला व पंच नं.1 यांना शेख पोलीस न दिसल्यामुळे मी माझेकडील मोबाइल फोनवरुन लोकसेवक शेख, पोलीस यांना फोन केला व पोलीस स्टेशनच्या बाहेर असलेल्या चहाचे टपरीवर असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने शेख, पोलीस यांनी पोलीस स्टेशनच्या बाहेर येवुन इकडे तिकडे पाहिले. शेख, पोलीस यांना माझेविषयी काहीतरी संशय आल्यामुळे ते माझेकडे पाहुन पुन्हा आतमध्ये गेले. त्यानंतर मी पुन्हा शेख, पोलीस यांना फोन केले, त्यावेळी शेख, पोलीस यांचा फोन स्विच ऑफ आला. त्यानंतर मी व पंच नं.1 रवाना केले त्या ठिकाणी परत आलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक देखील आले. तेथे आलेनंतर पोनि गमे यांचे सुचनेवरुन पोना चौधरी यांनी व्हाईस रेकर्डर ताब्यात घेवून बंद केले. पोनि गमे यांनी मला व पंच न. 1 यांना घडलेल्या घटनेबाबत विचारता आम्ही दोघांनी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. पोनि गमे यांनी व दोन्ही पंचांनी व्हईस रेकार्डर मध्ये रेकर्ड झालेले संभाशण ऐकले. ते मी व पंच 1 यांनी सांगितलेल्या हकीकतीषी मिळते जुळते असल्याची सर्वांची खात्री झाली. त्यानंतर सर्वानुमते सदरची सापळा कारवाई तुर्तास स्थगित करुन दि.17/10/2022 रोजी आयोजित करावयाचे ठरविले होते. त्यानंतर दि.17/10/2022 रोजी पोनि गमे यांनी मला शेख पोलीस यांचेविरुध्द लाचेचा सापळा आयोजित करावयाचे असल्याचे कळविले. त्यावेळी मी पोनि गमे यांना सांगितले की, दि. 13/10/2022 रोजी शेख, पोलीस यांना माझेविषयी काही तरी संशय आल्यामुळे त्यांनी माझेकडून लाचेची रक्कम स्विकारली नव्हती. त्यानंतर सदर कारवाई बाबत सर्वत्र चर्चा झाल्याने शेख, पोलीस हे माझेकडुन भविश्यात लाच स्विकारणार नाहीत यांची मला खात्री झाली आहे. तरी आपण ही सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करून दि.13/10/2022 रोजी मी नोंदविलेल्या तक्रारीचे अनुषंगाने लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान राहुरी पोलीस स्टेशन येथील पोलीस नाईक शेख यांनी माझेविरुध्द राहुरी पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयात चप्टर केसमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात तडजोडी अंती 4,000/-रुपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांचे विरूध्द कायदेषीर कारवाई करावी, असा जबाब लिहुन दिला. आज रोजी पोनि गमे यांनी माझेषी संपर्क केले प्रमाणे मी त्यांची राहुरी येथे सुरक्षित ठिकाणी भेट घेतली. तेथे त्यांनी दि.13/10/2022 रोजी शेख, पोलीस यांनी माझेकडे लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत वरिष्ठ कार्यालयाची परवानगी प्राप्त झाली असल्याचे सांगुन मला शेख, पोलीस यांचेविरुध्द फिर्याद देणेबाबत कळविले. त्याप्रमाणे मी फिर्याद देत आहे. तरी माझेविरुध्द राहुरी पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयात चप्टर केसमध्ये मला मतद केल्याचे मोबदल्यात राहुरी पोलीस स्टेशन येथील पोलीस नाईक, शेख यांनी मी दि.13/10/2022 रोजी नोंदविलेल्या लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने राहुरी पोलीस स्टेषन येथे करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान दुपारी 16/15 ते 16/30 वा. या कालावधीत पंच नं. 1 यांचे समक्ष माझ्याकडे तडजोडी अंती 4,000/-रु. लाचेची मागणी करून ती रक्कम स्विकारण्याची संमती दर्षविली असल्याने माझी लोकसेवक शामद शब्बीर शेख, पोलीस नाईक, राहुरी पोलीस स्टेषन यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. समक्ष

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील** अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Pratap Pandurang Darade(I (Inspector)) / API **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

**(3) Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

M. K. शेख

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)

पोलीस ठाणे अंमलदार
राहुरी पोलीस स्टेशन

**Name** (नाव): Pratap Pandurang Darade
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API